# ८० जागांसाठी ५५५ उमेदवारांमध्ये लढत

## माजी महापौरांसह १६४ जणांची माघार

▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

महापालिका निवडणुकीत रंगत वाढली असून बंडोबांचे बंड थंड करण्याचे आव्हान नेत्यांपुढे होते. बहुतांश ठिकाणी नाराजांनी तलवार म्यान केल्याने भाजपसह इतर पक्षांना दिलासा मिळाला. काही प्रभागांमध्ये मात्र बंडखोरी कायम असल्याने पक्षांची डोकेदुखी वाढली. अर्ज मागे घेण्याच्या आज शेवटच्या दिवशी माजी महापौरांसह १६४ जणांनी माघार घेतली. त्यानंतर आता ८० जागांसाठी ५५५ उमेदवारांमध्ये लढत होणार आहे. अकोला महापालिकेच्या २० प्रभागातील ८० जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीत भाजप व राष्ट्रवादी अजित पवार गट एकत्र, शिवसेना शिंदे गट स्वबळावर रिंगणात उतरले. शिवसेना ठाकरे गट सुद्धा स्वबळावर मैदानात असून काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार गटात आघाडी झाली आहे. उमेदवारांचे नावे पुढे येताच इच्छुकांमधील नाराजीचा स्फोट झाला.

अंतर्गत प्रचंड खदखद समोर आली. भाजपने ६२ जागांवर उमेदवार दिले, तर राष्ट्रवादीसाठी १४ जागा सोडल्या. भाजपमध्ये उमेदवारीसाठी तीव्र स्पर्धा होती. काहींना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी इतर पक्षांचा पर्याय किंवा अपक्ष अर्ज दाखल केले. अपक्ष अर्ज दाखल असलेल्या बंडोबांनी मुदतीत माघार घेण्यासाठी नेतृत्वाकडून प्रयत्न करण्यात आले.

भाजपच्या माजी महापौर सुमनताई गावंडे, काँग्रेसचे माजी महापौर सुरेश पाटील, भाजपचे माजी उपमहापौर राजेंद्र गिरी, माजी नगरसेवक गोपी ठाकरे यांच्यासह इतरांनीही माघार घेतली. त्यामुळे भाजपला दिलासा मिळाला. माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांचे पुतणे व माजी नगरसेवक आशिष पवित्रकार यांची अपक्ष उमेदवारी मात्र कायम आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या नाराजांनी देखील रिंगणातून माघार घेतली. काँग्रेसमध्ये एक-दोन ठिकाणी बंडखोरी झाली आहे.

८० जागांसाठी एकूण ७७७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननीमध्ये त्यातील ५८ अर्ज बाद ठरले. ७१९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. त्यातील एकूण १६४ उमेदवारांनी आज माघार घेतल्याचे महापालिका निवडणूक विभागाकडून सांगण्यात आले. विभाग क्रमांक एक मधून २४, दोन २५, तीन २६, चार व पाच प्रत्येकी ३२ आणि विभाग सहामधून २५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. या १६४ उमेदवारांच्या माघारीनंतर आता रिंगणात ५५५ उमेदवार राहिले आहेत. माघारीनंतर राजकीय समीकरण स्पष्ट झाले असून बहुतांश ठिकाणी दुरंगी, तिरंगी लढती होणार आहेत.

### जिल्हास्तरीय रस्ते सुरक्षा समितीची बैठक

# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सिग्नल प्रणालीत सुधारणा करा : जिल्हाधिकारी वर्षा मीना

▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

शहरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता अद्ययावत सिग्नल प्रणाली कार्यान्वित करणे, सिग्नलच्या योग्य वेळा निर्धारित करणे तसेच अनावश्यक गतिरोधक काढून टाकण्याचे निर्देश रस्ते सुरक्षा समिती बैठकीत जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित यंत्रणांना दिले. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत रस्ते सुरक्षा समितीची बैठक महसूल सभागृहात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, शहर वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक मनोज बहुरे,मनपा शहर अभियंता नीला वंजारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रतिनिधी उपस्थित होते.या बैठकीत वाहतूक व पार्किंग



व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला.अवैध पार्किंगमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र आहे. अधिकृत वाहनतळांची पाहणी करावी आणि त्याच ठिकाणी पार्किंग होईल, अशी व्यवस्था करावी. शिवणी विमानतळासमोरील रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.पोलीस अधिक्षक श्री.चांडक म्हणाले की, काही ठिकाणी अनावश्यक लावलेले गतिरोधक अपघातास कारणीभूत ठरत असल्याने अशा गतिरोधकांची तातडीने पाहणी करून आवश्यक कारवाई करावी.

# सिव्हील लाईन हद्दीत युवकाची हत्या प्रकरणी आरोपी पोलिसाच्या ताब्यात

▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

गुन्हयाची थोडक्यात हकीकत :- हकीकत अशा प्रकारे आहे की, पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, अकोला येथे आज दिनांक ०२/०१/२६ रोजी ०८.०० वाजताचे सुमारास सुरज रामराव भगेवार रा. संजय नगर, मोठी उमरी मोबाईल क्रमांक ९९२२३८३८७८ वरून डायल ११२ ला कॉल केला की संजय नगर मोठी उमरी येथे अमोल डिगांबर पवार वय ३५ वर्षे यांचा मर्डर झालेला आहे वरून बिट मार्शल वरील कर्मचारी यांनी पोलीस स्टेशनचे तपास



पथकातील कर्मचारी व बिट कर्मचारी यांना माहीती दिली. पोस्टे चे तपास पथक व बिट अंमलदार यांनी तत्परता दाखवित घटनास्थळी रवाना होवुन मृतक अमोल डिगांबर पवार यांचे घरी पोहचुन गुप्त बातमीदाराकडुन माहीती मीळाली की नितेश अरूण जंजाळ वय ३८ वर्षे व मृतक अमोल डिगांबर पवार दोन्ही रा. संजय नगर मोठी उमरी अकोला हे चांगले मीत्र असुन नेहमी सोबत राहतात त्यांच्यामध्ये काल दिनांक ०१/०१/२५ रोजी भांडण झालेले आहे अशा खात्रीलायक बातमीवरून आरोपी नितेश अरूण जंजाळ वय ३८ वर्षे रा.संजय नगर मोठी उमरी अकोला यांचे घरी जावुन पाहीले.

# विविध अफवांना मूठमाती देत मतदारांनी भाजपाला एक हाती सत्ता दिली : खा. अनुप धोत्रे

▪हिवरखेड,दि २ (प्रतिनिधी)▪

केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टीची एक हाती सत्ता आहे हिवरखेड येथे नगराध्यक्ष सह मतदार राजांनी ११ नगरसेवक निवडून देऊन भाजपाला एक हाती दिल्याबद्दल हिवरखेडच्या मतदारांचे आभार हिवरखेड येथे गेल्या काही वर्षापासून विरोधी पक्षांकडून अफवा पसरवल्या जात होत्या त्यामध्ये हिवरखेड ला रेल्वेचा थांबा मिळणार नाही.

तसेच हिवरखेड ही कधीही नगरपरिषद होणार नाही अश्या अनेक अफवा विरोधी पक्षांकडून निवडणुकी दरम्यान व निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणात पसरविल्या गेल्या मात्र भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांची जाण ठेवून ग्राउंड लेव्हलवर काम करणारा पक्ष आहे त्यामुळे सर्व काम मार्गी लागले. व पुढेही मतदारांची कामे करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत असे प्रतिपादन अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांनी केले ते हिवरखेड येथे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुलभा रमेश दुतोंडे व व ११ नगरसेवकांच्या पदग्रहण कार्यक्रमात बोलत होते या कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी अकोट मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश भारसाकळे हे होते तर प्रमुख उपस्थितीत उमेश पवार, अकोला जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष जयश्री फुंडकर,अकोट मंडळ अध्यक्ष गोपाल मोहोड, हिवरखेड मंडळ अध्यक्ष मंगेश दुतोंडे, कुलदीप तराळे हे होते. यावेळी आमदार प्रकाश भारसाकळे यांनी सुद्धा हिवरखेडच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे वचन दिले.

### 'विटेक्स-विदर्भ उद्योग व व्यापार प्रदर्शन२०२६' चा शुभारंभ

# राज्यात सर्वदूर उद्योगवाढीसाठी शासनाचा प्रयत्न : राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

उद्योगांच्या विकासासाठी राज्य शासनाकडून अनेकविध प्रकल्प व योजना राबविण्यात येत आहेत. गावोगाव उद्योग निर्माण होण्यासाठी चेंबर ऑफ कॉमर्सच्या 'गाव तिथे उद्योजक'सारख्या उपक्रमांना निश्चित सहकार्य करण्यात येईल, असे प्रतिपादन शालेय शिक्षण, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज येथे केले.

विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीद्वारे गोरक्षण मैदानावर आयोजित विटेक्स - विदर्भ उद्योग व व्यापार प्रदर्शन २०२६ चे प्रदर्शनाचा शुभारंभ राज्यमंत्री डॉ. भोयर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे, सुनील




इन्नाणी, शिवप्रकाश रुहाटिया, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष निकेश गुप्ता, सचिव नीरव वोरा आदी उपस्थित होते.

राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, राज्याच्या सर्व भागांत विकास होण्यासाठी पायाभूत सुविधांबरोबरच उद्योगवाढीसाठी प्रोत्साहन शासनाकडून दिले जात आहे. गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात स्टील उद्योग निर्माण होत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे उद्योगवाढीसाठी हाती घेतलेल्या उपक्रमांना शासनातर्फे निश्चित सहकार्य केले जाईल.

केंद्र शासनातर्फे क्रेडिट गॅरंटी प्रोग्राम सारख्या योजनांतून व्यापार, उद्योगाला प्रोत्साहन दिले जात आहे.

## थोडक्यात

### श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांची जयंती साजरी

**अकोला** :श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांचा ९८ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांना श्री हनुमान जयंती दिनी साक्षात्कार झाल्यामुळे श्री हनुमान जयंती दिनी दरवर्षी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात यात्रा भरविण्यात येते. दि. २५ डिसेंबर ते १ जानेवारी पर्यंत देव वाकी येथे श्री संत परमहंस झाबुजी महाराज यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या जयंती महोत्सवामध्ये नामवंत प्रवचनकारांची प्रवचने झाली यामध्ये श्री जीवणे गुरुजी, श्री नारायण मते, श्री ज्ञानेश्वर सात, श्री संजय महाराज वानखडे, श्री बाबुलाल महाराज मोरे, श्री मोतीरामजी मोहोड, श्री गजानन महाराज पवित्रकार, श्री नामदेव महाराज टापरे यांची किर्तने यावे संपन्न झाली.

### शहरात विविध प्रभागात मतदान जनजागृती!

अकोला: अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून निवडणूक आयोगाच्या नियमावलीचे काटेकोरपणे पालन केले जात आहे.निवडणूक विभागाच्यावतीने शहराच्या विविध प्रभागात मतदान, जनजागृती महानगरपालिका निवडणूक २०२५ - २६ अनुषंगाने अकोला मोहीम जोमाने राबविल्या जात आहे. सार्वत्रिक महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यातआले असून, या अनुषंगाने २८ डिसेंबर रोजी मनपा प्रशासनाव्दारा शहरातील विविध भागातील ऑटोंवर तसेच रस्त्यावरील डिव्हाइडरवर मतदार जनजागृतीचे स्टिकर लावून जनजागृती करण्यात आली.

# पोलीस स्टेशनला विद्यार्थ्यांची भेट पोलिस व्यवस्थेची घेतली माहिती जाणून



▪मुर्तिजापुर,दि २ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त दि. ०२ जानेवारी रोजी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतून मुर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशन येथे प्रभावी जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात ॲकेडमीक हाइट पब्लिक स्कूल, मुर्तिजापूर येथील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमध्ये बोलावून पोलिसी व्यवस्थेची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली.विद्यार्थ्यांना महाराष्ट्र पोलीस दलाचे कार्य, पोलीस स्टेशनचे कामकाज, शस्त्र हाताळणी, मिशन उडान, रक्षा/सेवा प्रणाली, डायल ११२ व दामिनी हेल्पलाईन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.या कार्यक्रमात ठाणेदार श्रीधर गुट्टे, पीएसआय मनीषा सामतकर, एएसआय संजय खंडारे, हेड कॉन्स्टेबल नितीन वडतकर, ज्ञानेश्वर रडके, अंकिता मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल गणेश ठाकरे, प्रशांत भवाने, शंकर खेडकर व सोनल यांनी मार्गदर्शन केले. उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदा, शिस्त व सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली.

# नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी

अकोला : मानव, पशुपक्षी आणि पर्यावरणासाठी घातक असलेल्या नायलॉन मांजाची विक्री तसेच वापर करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या तक्रारीची प्रत पोलिस अधीक्षक तसेच महानगरपालिका आयुक्त यांनादेखील देण्यात आली आहे. नायलॉन मांजा गळ्यात तसेच दुचाकी वाहनात अडकल्यामुळे अनेकांनी आपले प्राण गमावले असून काहींना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे.

पक्षी आणि प्राणी यांच्या जिवीतासाठी देखील नायलॉन मांजा धोकादायक आहे. सध्या महानगरपालिका निवडणूकीचे वारे वाहत आहे. १४ जानेवारी रोजी 'मकरसंक्रांत' आहे १५ जानेवारी रोजी मतदान असून १६ ला मतमोजणी होणारआहे. शासकीय यंत्रणा निवडणूक प्रक्रियेत व्यस्त राहिल. याचा गैरफायदा नायलॉन मांजाचे विक्रेते आणि वापर करणारे घेऊ शकतात. नायलॉन मांजाचे विक्रेते तसेच मांजाचा वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी विनंती सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली आहे.

# लाखपुरी येथील अर्चना विद्यालयामधील १९८३ -१९८४ मधील माजी विद्यार्थी मेळवा व कृतज्ञता सोहळा



▪लाखपुरी,दि २ (गजानन गवई)▪

मुर्तिजापुर तालुक्यातील लाखपुरी येथील अर्चना विद्यालय लाखपुरी येथे सन १९८३ -१९८४ मधील वर्ग -१० वी च्या माजी विद्यार्थी मेळावा १ जानेवारी ला लाखपुरी येथील अर्चना विद्यालयात घेण्यात आला . सर्व प्रथम सरस्वती पुजन व थोर महापुरुषाच्या पुजन करण्यात आले व दिप प्रज्वलन करण्यात आले. सदर मेळाव्यामध्ये अध्यक्ष म्हणुन मधुकराव कोकाटे हे होते.तर प्रमुख उपस्थितीमध्ये अ.शे देशमुख,डी,यु,राजपूत, के.एन.राऊत,प्रा. गडगीकर सर, अशोक कोथळकर, कुरेकर सर ,श्रीकृष्ण हिंगणकर,आर. एम. भुतडा,अर्चना विद्यालयांचे मुख्याध्यापक संजय राजपुत, एस. पी. नाचणे, एस.एस. डोंगरे,जी.टी.राऊत ,महादेव ढाकरे , गोवर्धन जोगी व पत्रकार बांधव सह इ मान्यवर उपस्थित होते व माजी विद्यार्थ्यांनमध्ये सतीष चौहान,रामदास भोपत,महेंद्र नवघरे,हेमप्रकाश मेहर, दिलीप सुरजुसे, मधुकर जामनिक,मनोज शर्मा,रामकृष्ण पोटे,रघुनाथ वानरे,पुरुषोत्तम घनमूळे, अनिल चौधरी ,अरुण कोकाटे ,यादव जामनिक,किसन बावणे,रंगराव जामनिक ,गजानन धानोरकर,सुरेंद्र चौहान,मनोहर अवघाते,प्रकाश विचुरकर, ज्योती व्यास, शोभा कानकिरड, अन्नपूर्णा खंडारे, सुनिता गावंडे,अरुणा खारोळे, शितल शर्मा, संतोषी शर्मा सह अर्चना विद्यालयातील शिक्षक वृंद, कर्मचारी वृंद,उपस्थिती होती. मान्यवरांनी व माजी विद्यार्थांनी मनोगत व्यक्त केले. काही माजी विद्यार्थीनी मनोगत व्यक्त करित असतांना डोळ्यांत भावनीक अश्रु आले .

# खडकीच्या जि.प. नगरात भव्य अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन



▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

स्थानीय खडकी परिसरातील जि प नगरातील हनुमान मंदिर प्रांगणात सालाबाद प्रमाणे यावर्षीही अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री निवृत्तीनाथ महाराज सेवा समिती व समस्त जिल्हा परिषद कॉलनी निवासी खडकी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा सप्ताह दिनांक ८ जानेवारी ते १५ जानेवारी पर्यंत राहणार आहे.

ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण सोहळ्याचे प्रवक्ते नांदखेड टाकळी येथील हभप भानुदास महाराज सखारामपुरकर हे राहणार आहेत. श्री क्षेत्र मेहून येथील हभप गुरुवर्य शारंगधर महाराज मेहुनकर यांच्या मार्गदर्शनात आयोजित या सप्ताहात दिनांक ८ जानेवारी रोजी स ९ वाजता गजानन विजय ग्रंथ पारायण होणार आहे. तर ९ जानेवारी रोजी ज्ञानेश्वरी भावकथा निरूपण प्रारंभ होणार आहे.या सप्ताहात स ५ वाजता काकडा, स ६ वाजता आरती, दुपारी १२ ते दु ४ वाजेपर्यंत हरिपाठ व रात्री ८ वाजता हरी किर्तन होणार आहे नित्य रात्री ८ ते रात्री १० वाजेपर्यंत आयोजित या हरिकीर्तनात गुरुवार दि ८ जानेवारी रोजी अकोला येथील हभप श्रीकृष्ण महाराज मुरकर हे प्रथम कीर्तन सादर करणार आहेत.तर शुक्रवार दिनांक ९ जानेवारी रोजी भागलवाडी येथील कीर्तनकार हभप नारायण महाराज शास्त्री यांचे कीर्तन होऊन शनिवार दिनांक १० जानेवारी रोजी वारखेड येथील कीर्तनकार हभप हरिभाऊ महाराज मेहुणकर यांचे कीर्तन होऊन रविवार दिनांक ११ जानेवारी रोजी भुसावळ येथील कीर्तनकार हभप किशोर महाराज तळवेल हे कीर्तन सादर करणार आहेत. सोमवार दिनांक १२ जानेवारी रोजी धाराशिव येथील कीर्तनकार हभप संभाजी महाराज मेहुणकर यांचे कीर्तन होऊन मंगळवार दिनांक १३ जानेवारी रोजी वारी भैरवगड येथील कीर्तनकार हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन होऊन सोमवार दिनांक १४ जानेवारी रोजी गाडेगाव येथील वेदांताचार्य हभप पुरुषोत्तम महाराज बावरकर यांचे कीर्तन होणार आहे.दिनांक १५ जानेवारी रोजी श्री क्षेत्र मेहून तापीतीर येथील वारकरीभूषण हभप शारंगधर महाराज मेहुनकर यांचे सकाळी १० वाजता काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तीभावात सांगता होणार आहे. या किर्तन उत्सवात गायनाचार्य म्हणून हभप किशोर महाराज लढे,हभप गोपाल महाराज दौड, हभप जगन्नाथ महाराज मच्छिंद्र खेड, हभप योगेश महाराज ,मोरदड तर मृदुंगाचार्य हभप ज्ञानेश्वर महाराज यादगिरे राहणार आहेत.

# महानगरात शाकंभरी प्राकट्य उत्सव

▪अकोला,दि २ (प्रतिनिधी)▪

येथील स्थानिक शक्तिधाम सेवा समितीच्या वतीने दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता गीता नगर येथील शक्तिधामच्या प्रांगणात भव्य शाकंभरी प्राकट्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात काशीहून पधारलेल्या पुजाऱ्यांमार्फत भव्य गंगा आरती सोहळा संपन्न होणार आहे.

या पावन उत्सवात उत्तर प्रदेशातील नानपारा धाम येथील प्रसिद्ध मंगलपाठ गायक श्रीकुमार शानू माताजी यांचा भव्य संगीतमय मंगलपाठाचा कार्यक्रम होणार आहे. उत्सवादरम्यान शाकंभरी मातेंचा भव्य दरबार, झांकी दर्शन, दिव्य ज्योत दर्शन, गजरा उत्सव, छप्पन भोग दर्शन तसेच फुलांची होळी यांचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. विशेषतः काशीच्या भक्तिमय



परंपरेनुसार गंगा आरतीचे आयोजन करण्यात येणार असून, मुख्य यजमान म्हणून मनोज कृष्णकुमार सुरेका व त्यांचे कुटुंब उपस्थित राहणार आहेत.

या पवित्र शाकंभरी उत्सवाचा लाभ मोठ्या संख्येने माता भक्तांनी घ्यावा, असे आवाहन शक्तिधाम सेवा समिती अकोला यांच्या तर्फे करण्यात आले.

